ग्रामपंचायती/जिल्हा परिषदांनी हस्तांतरीत करुन न घेतलेल्या पाणी पुरवठा योजनावरील देखभाल व दुरुस्तीपोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देय असलेली थकबाकी वसुल करणे.
शासनाकडून जिल्हा परिषदांना देय अनुदानातून

अपामाउ ता१८

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र ग्रापापु-२००४/प्रक्र- १९६/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ ऑक्टोबर, २००४**

वाचा :- शासन निर्णय, **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९८/प्रक्र- १७६/पापु-०७,**
दिनांक **२४.८.१९९८**

**प्रस्तावना :**

राज्यातील ज्या जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती नळ पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करुन घेत नाहीत अशा जिल्हा परिषदांना शासनाकडून राज्यस्तरीय योजनांतर्गत तरतूदीच्या आणि केंद्र शासन पुरस्कृत वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत दरवर्षीच्या योजनांतर्गत तरतूदीच्या देय असणा-या एकूण १०% अनुदानापैकी देय ठरणा-या अनुदानातून २०% इतकी रक्कम वळती करुन ती शासन स्तरावरुन थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अदा करण्यास संदर्भीय दिनांक २४.८.१९९८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्यामध्ये मागील काही वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात प्रादेशिक योजना राबविण्यात आल्या असून जिल्हा परिषदा सहजा सहजी या योजना ताब्यात घेत नाहीत. परिणामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास या अहस्तांतरीत प्रादेशिक योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करावा लागत असल्याने संदर्भिय दिनांक २४.८.१९९८ च्या शासन निर्णयातील शासन स्तरावरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वळती करुन द्यावयाची रक्कम २०% वरून ५०% पर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांमधील योजनांतर्गत तरतूदीमधून व केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मिळणा-या तरतूदीमधून जिल्हा परिषदांना **देखभाल व दुरुस्तीसाठी** देय असलेल्या **अनुदानाच्या ५०% इतकी रक्कम वळती करुन ती शासन स्तरावरुन थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.**

२.	जिल्हा परिषदांना देखभाल व दुरुस्तीसाठी देय असणा-या अनुदानातून वरील प्रमाणे रक्कम थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अदा केल्यामुळे जिल्हा परिषदांना देखभाल व दुरुस्तीसाठी देय ठरणा-या अनुदानामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

३.	हे आदेश सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून देय झालेल्या अनुदानासाठी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. प्रधान सचिव (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग
९. विभागीय आयुक्त (सर्व) .
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५. महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१६. महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१७. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
१८. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२०. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग